- HINDI
- MATHS
- ENGLISH
- MARATHI
- PHYSICS
- CHEMISTRY
- PHILOSOPHY
- BIOLOGY
- ENGINEERING
- INFORMATION TECHNOLOGY
- LIFE SCIENCES
- COMMERCE
- MANAGEMENT
- BUSINESS ORGANISATION
- SOCIOLOGY
- AGRICULTURE
- PUBLIC ADMINISTRATION
- HOME SCIENCE
- HUMAN SCIENCE
- MUSIC
- POLITICAL SCIENCE
- LAW
- ECONOMICS
- GEOGRAPHY
- EDUCATION
- HISTORY
- MILITARY SCIENCE
- COMPUTER
- PSYCHOLOGY
- HUMANITIES & SOCIAL SCIENCES
- LANGUAGES
- MANAGEMENT

ISSN 2395-759X

ISSN 2395-759X

स्वत्वधिकारी, मुद्रक, प्रकाशक एवं संपादक - प्रा. मयुर बंडू लहाने द्वारा आकांक्षा टंकलेखन बहुउद्देशीय संस्था
राममंदीर के पास, पेठ पुरा, हिवरखेड (रूप.), ता. तेल्हारा, जि. अकोला, महाराष्ट्र - ... से प्रकाशित

RNI-MAHMUL/2015/74000

ISSN : 2395-759X

An International Indexed, Refereed, Peer Reviewed, Interdisciplinary, Multilingual, Multisubject, Monthly Research Journal

Vol. VI ■ Issue XI ■ November 2020

Impact Factor : 5.025

# Akanksha...

New Directions & Challenge

आकांक्षा...

नई दिशा और आव्हाने

# आकांक्षा...

नवी दिशा आणि आव्हाने.

■ Editor - In - Chief

*Prof. Mayur Bandu Lahane*

Published by :- Akanksha Tankalekhan Multipurpose Society

Near ...m Mandir, Peth Pura, Hiwarkhed (Rup.), Tq. Telhara, Dist. Akola, (MH) 444 103

**Advisory Committee**

**Dr. Vikas Singhal**
Assistant Reginal Director,
Indira Gandhi National Open University,
Nagpur.
**Dr. Pranay R. Malviya**
Principle,
Dr. Panjabrao Deshmukh collage of law,
Amravati
**Dr. S. K. Deshmukh**
Principle,
College of Enggneing and Techology,
Akola
**Dr. Shubhash S. Gawai**
Head, Department of Pol. Science,
Bhartiya Mahavidyalay, Raja Peth,
Amravati
**Dr. Rama R. Fuke**
Head, Department of Education
Priyadarshini college of Education, Nagpur
**Prof. Vivek H. Hiware**
Head, Department of English
Shri Shivaji College, Akola

**Peer Committee**

**Prof. Ille C. Gebeshuber**
Professer of Physics
Vienna University of Technology
Austria (Europe)
**Prof. Diana L Gustafson**
Faculty of Medicine,
Memorial University of Newfoundland,
Canada
**Dr Richard Clay**
Department of Art History,
University of Birmingham,
Edgbaston UK
**Dr. Mutavalli Maizoddin Mainoddin,**
Depertment of Marathi
Ranichananama University
Belgaon Karnatak
**Dr. Sanjay M. Ayade**
Govt. College of Education Bilaspur,
Chhattisgarh
**Dr. Dilip Alone**
Depertment of Marathi
L.T.M. College Wani

**Peer Review Committee**

**Dr. Vilas V. Tayde**
Depertment of Marathi
Shri Shivaji Arts, Comm. & Science College,
Akot
**Dr. Kamlakar Payas**
Depertment of Marathi
Takshashila college, Amravati
**Dr. Sunanda K. Reose**
Depertment of Marathi
Shri Pundalik Maharaj Mahavidyalay
Nandura Railway Dist Buldhana
**Dr. Dnyaneshwar S. Shambhrkar**
Head, Department of Pol. Science,
S.B. Mahila Mahavidyalay Mahal,
Nagpur

**Dr. G. L. Gulhane**
Head, Department of Education
Sant Gadage Baba Amaravati University
Amravati.
**Dr. Santosh N. Tade**
Head, Depertment of Economics
Shri Narshing College, Akot
**Dr. Basant Tripathi**
Head, Department of Hindi,
S.B. Mahila Mahavidyalay Mahal,
Nagpur.
**Dr. Suvarna Shinde**
Head, Department of English,
Arts & Commerce College for Women
Deopur, Dhule


# Index

**Sr. No.** **Contents** **Page No.**


१. " जगाला पडलेलं एक सुंदर स्वप्न – डॉ. ए.पी.जे. कलाम"
— प्रा. डॉ. सुनंदा रेवसे १–५

२. 'नैसर्गिक संसाधने आणि सामाजिक न्याय: वंचितांच्या परिप्रेक्ष्यातून"
— डॉ. संजय चौधरी ६–१५

3. Literature Review of V. S. Naipaul's Works
- Dr. Vijay Baburao Pande १६–२२

4. IMPACT OF E-COMMERCE ON INDIAN ECONOMY
- Prof. Harivijay Dudhe २३–२८

AKANKSHA..... New Directions & Challenges

आकांक्षा..... नवी दिशा आणि आव्हाने

आकांक्षा..... नई दिशा और आव्हाने

An International Indexed, Refereed, Peer Reviewed, Interdisciplinary, Multilingual, Multisubject, Monthly Research Journal.

**Issue**
November 2020

**RNI No.**
MAHMUL/2015/74000

**ISSN**
2395-759X

**Editor-In-Chief**
Prof. Mayur B. Lahane
Cont :- 9096593842
Email :- akankshajournal@gmail.com
lahane_mayur@rediffmail.com

**Date of Publication**
25th of Every Month

**Owner, Printer's, Publisher Name**
Prof. Mayur Bandu Lahane

**Printed & Published At**
Akanksha Tankalekhan Multipurpose Society,
Near Ram Mandir, Peth Pura, At.Post. Hiwarkhed (rup)
Tq. Telhara Dist. Akola Maharashtra 444103.

**Single Issue Price**
100/-

© All Rights are reserved with the publisher. The opinion expressed are of the authors and the Publisher, Editor-in-Cheif, Editorial Board, as well as the peer's committee, Peer Review committee does not hold any responsibility for any of the views expressed.

© मासिकातील मते, संदर्भ, घटना, व अन्वयार्थ हे लेखकाचे स्वतंत्र संशोधन लेखन आहे या बाबीशी प्रकाशक, मुख्य संपादक, संपादक मंडळ, सल्लागार समिति, समीक्षक मंडळ सहमत असेलच असे नाही.

© मुख्य सम्पादक – प्रा. मयुर लहाने का मानद पद एवं कार्य पूर्णतः अवैतनिक है । इस शोध पत्रिका के प्रकाशन, सम्पादन, एवं मुद्रण में पूर्णतः सावधानी बरती गई है। किसी भी प्रकार की त्रुटि महज मानवीय भूल मानी जाए । त्रुटी हेतु सम्पादक, प्रकाशक एवं मुद्रक जिम्मेदार नही होगा ।

---

NISCAIR

**NATIONAL INSTITUTE OF SCIENCE COMMUNICATION AND INFORMATION RESOURCES**
(Council of Scientific and Industrial Research)
14, Satsang Vihar Marg, New Delhi 110 067

ISSN

G. Mahesh, Ph.D.
Head, National Science Library
Phone: 91-11-26863759
E-mail: gmahesh@niscair.res.in website: http://nsl.niscair.res.in

NSL/ISSN/INF/2015/1182 Dated: May 29, 2015

Mayur Bandu Lahane
Akansha Tankalekhan Multipurpose Society
Hiwarkhed (Rup) Tq. Telhara
Dist. Akola 444 103

Dear Sir/Madam,
महोदय /महोदया

We are happy to inform you that the following serial(s) published by you has been registered and assigned ISSN (Print)

हमें आपको यह सूचित करते हुए प्रसन्नता हो रही है कि निम्नलिखित प्रकाशन पंजीकृत कर लिए गये है एवं (प्रिंट) आई.एस.एस.एन. आवंटित कर दिये गये है

ISSN 2395-759X Akansha....Navi Disha ani Aavhane
आकांक्षा ....नवी दिशा आणि आव्हाने

It is important that the ISSN should be printed on every issue preferably at the right hand top corner of the cover page.
प्रकाशन की प्रत्येक प्रति के कवर पेज के दाहिनें ओर के ऊपरी सिरे पर आई.एस.एस.एन. छपा होना आवश्यक है।

We will be responsible for monitoring the use of ISSN assigned to Indian Serials and for supplying up to-date data of the same to the International Centre for ISSN, Paris. For this purpose we request you to send us the forth coming issue of your serial on complimentary basis.

भारतीय राष्ट्रीय केंद्र की जिम्मेदारी होगी कि वह भारतीय पत्रिकाओं को आवंटित आई.एस.एस.एन. की जाँच करेगा एवं अद्यतन डाटा की जानकारी इंटरनेशनल सेंटर फॉर आई.एस.एस.एन. पैरिस को भेजेगा। अतः आपसे अनुरोध है कि इस कार्य हेतु प्रकाशन की एक प्रति आई.एस.एस.एन. प्रिंट करके सम्मानार्थ भेंट हमें भेजे।

We solicit your co-operation in this regard.
आपके सहयोग के लिए हम आभारी रहेंगे।

भवदीय

(जी महेश)
हेड
नेशनल साइंस लाइब्रेरी एवं आई. एस. एस. एन.

An International Indexed, Refereed, Peer Reviewed, Interdisciplinary, Multilingual, Multisubject Monthly Research Journal
Vol. VI, Issue XI, November 2020
ISSN 2395-759X

# १. ''जगाला पडलेलं एक सुंदर स्वप्न – डॉ. ए.पी.जे. कलाम''

**प्रा. डॉ. सुनंद्रा रेवसे,**
श्री पुंडलिक महाराज महाविद्यालय,
नांदुरा (रेल्वे) जि. बुलढाणा

डॉ. ए. पी. जे. कलाम म्हणजे दुसरं तिसरं काही नसून जगाला पडलेलं एक सुंदर स्वप्न होय. जे स्वप्न प्रत्यक्षात उतरलं आणि सारा देशच प्रत्यक्षपणे जागा झाला. खरंच, स्वप्ने ही जागेपणी पडावी लागतात हेच खरे. अन्यथा ती स्पप्ने नसतातच असतात ते भ्रम. भ्रमाचा भोपळा होऊन मग तो फुटायला सुद्धा वेळ लागत नाही. पण जागृत अवस्थेत जी स्वप्ने पडतात ती सर्व मंगल करुन टाकतात. सर्व कुशल करून टाकतात आणि निश्चल सुद्धा.

'कर्मयोगी' हा स्वप्ने पूर्ण करत असतो. स्वत:ची आणि इतरांची देखिल. ''संपूर्ण देश विकसित व्हावा हा डॉ. कलाम यांचा ध्यास होता. हाच ध्यास घेऊन देशात आज लक्षावधी कार्यकर्ते तन–मन–धन अर्पून काम करत आहेत.''[१] त्या कार्यकर्त्यांच्या ठायी चेतना जागविण्याऱ्या मेंदू आणि मनगटांचे आपण काळाची साद समजून आव्हान पेलण्यास सज्य होण्याची गरज आहे. आव्हान पेलण्याचं सामर्थ्य दाखविणारा कर्मयोग्यापेक्षा कधीच कमी नसतो.

डॉ. ए. पी. जे. कलाम यांना अगदी बालपणापासूनच आकाशात उडण्याची आवड होती. त्यांना तशा प्रकारचे स्वप्न पडत असायचे म्हणून ते म्हणायचे की, स्वप्न खरं होण्याआधी ते जगायला शिका. स्वप्नात जगणं आणि स्वप्न जगणं यात महा अंतर असतं. जगणं आणि जगण्याचं आकर्षण असणं यात एक अनामिक संबंध असतो. जो जागा असेल त्यालाच जगण्याचं आकर्षण असेल हा संबंध अभिप्रेत होता. जगण्याच्या आकर्षणातून एक इच्छा निर्माण होते आणि तिच पुढे इच्छा पूर्तीच्या स्वरुपात स्वप्न पूर्ण करत असते. हीच ध्येयपूर्ती होय. ही अवस्थाच स्वप्न साकार होण्याची व्यवस्था करत असते.

डॉ. ए. पी. जे. कलाम हे प्रगतशील भारत व्हावा म्हणून सतत कटिबद्ध होते. तामिळनाडू मधील रामेश्वरम् येथे १५ ऑक्टोबर १९३१ मध्ये त्यांचा जन्म झाला. ''मद्रास इंन्स्टीटयूट ऑफ टेक्नालॉजी' (MIT) मध्ये त्यांनी एरोनॉटीकल इजिनिअरिंगचा अभ्यास केला. भारताचा पहिला उपग्रह अंतराळात पाठविण्याचा प्रक्षेपक 'SLV - 3' तयार करण्यात त्यांनी महत्वाची कामगिरी बजावली. त्या प्रक्षेपकाव्दारा १९८० मध्ये 'रोहिणी' उपग्रह प्रक्षेपीत केला. या त्यांच्या कामगिरीमुळे

...national Indexed, Refereed, Peer Reviewed, Interdisciplinary, Multilingual, Multisubject Monthly Research Journal
Vol. VI, Issue XI, November 2020
ISSN : 2395-759X

भारताचा 'स्पेस क्लब' मध्ये प्रवेश झाला. त्यानंतर भारताची महत्वाची क्षेपणास्त्रे तयार करुन ती कार्यान्वीत करण्यात आली. १९९८ मध्ये भारतात अणू चाचण्या घडविण्यातही त्यांचा महत्वाचा वाटा होता.

देशातील अग्रणी शास्त्रज्ञ तसेच 'टेक्नालॉजी इंन्फरमेशन आणि फोरकास्टिंग अॅण्ड असेसमेंट कौन्सिल' (TIFAC) चे अध्यक्ष म्हणून पाचशे तज्ज्ञांच्या मदतीने 'टेक्नालॉजी व्हिजन – २०२०' तयार करुन एक 'प्रगत राष्ट्र' म्हणून भारतामध्ये बदल घडवून आणण्यातही त्यांचा पुढाकार होता.''[२]

'मूल' हे जगातील आदय संशोधक होय असे डॉ. ए. पी. जे. कलाम यांच स्पष्ट मत होतं. त्यांच्यामते, मुले ही सतत जे दिसेल ते पाहत असतात आणि जे समजलं नाही त्याला का? असा सवाल करतात. संशोधक सुद्धा हेच करत असतो. हिच सवयपुढे योग्य मार्गाने विकसीत केली तर तोच संशोधक बनत असतो.

युवा पिढीची आकांक्षा काय आहे? ते स्पष्ट करण्यासाठी डॉ. ए. पी. जे. कलाम हे एक उदाहरण देतात. ते म्हणतात, "११ एप्रिल २००२ या दिवशी संध्याकाळी मी आनंदला पोहोचलो. तेव्हा तिथे जातीय दंगलीमुळे 'कर्फ्यू' पुकारण्यात आला होता. दुसऱ्या दिवशी आनंदालय हायस्कूल मध्ये विद्यार्थ्यांशी बोलतांना एक प्रश्नही आला : आपला शत्रु कोण? प्रश्नांची खुप उत्तरे मुलांकडून आली : परंतु तिच्याकडून आलेले उत्तर अचूक होते. ते सर्वांनी मान्यही केले. आपला शत्रु आहे गरीबी! आपल्या समोरच्या अनेक प्रश्नांचे ते एकच मूळ आहे. गरीबी हा आपल्या लढाईचा विषय व्हायला हवा. आपापसातल्या भांडणांचा नव्हे''[३] बारावी शिकणाऱ्या म्हणजेच ते उत्तर देणाऱ्या स्नेहल ठक्कर नावाच्या मुलीला डॉ. ए. पी. जे. कलाम यांनी प्रज्वलीत मने 'इग्नायटेड माइंडस्' हे पुस्तक अर्पण केले. गरीबी म्हणजे काय? ते डॉ. ए. पी. जे. कलाम यांनी अनुभवलं ते जगले, अनुभवले गरीबीचे क्षण. या संदर्भात त्यांचा एक अनुभव सांगते की, "त्यावेळेस कॉलेजचे शिक्षण बरेच महागडे होते. प्रवेश फी साठी एक हजार हवे होते. तितका निधी त्यांच्या वडीलांकडे नव्हता. त्यांची बहिण ''जोहरा'' हिने त्यावेळी अंगावरचे दागिने ठेवून पैसे प्राप्त करुन दिले. तत्क्षणीच डॉ. ए. पी. जे. कलाम यांनी दृढसंकल्प केला की, हा विश्वास सार्थ करुन दाखविन आणि बहिणीचे दागीनेही स्वतःच्या पैशातून सोडवून दाखविन.''[४]

गरीबीचे आणखी एक उदाहरण म्हणजे डॉ. ए. पी. जे. कलाम यांनी एका रशियन लेखकाचे पुस्तक विकत घेतले. वाचनाची आवड पूर्ण करण्यासाठी



An International Indexed, Refereed, Peer Reviewed, Interdisciplinary, Multilingual, Multisubject Monthly Research Journal
Vol. VI, Issue XI, November 2020
ISSN : 2395-759X

मात्र त्यामुळे त्यांना सुट्टीत घरी जाता आले नाही कारण पैसेच नव्हते. अखेर त्यांनी ते पुस्तक विकायचे ठरवले पण घेणार कोण? अब्दुल परत त्या पुस्तक विक्रेत्याकडे गेले. विक्रेत्याने ते पुस्तक गहाण ठेवून घेतले नंतर डॉ. ए. पी. जे. कलाम यांनी गावावरुन आल्यावर ते पुस्तक सोडवून घेतले.

स्वप्नपूर्ती करत असताना एकावेळी एकच स्वप्न पहावे हाच संदेश जणू या दोन्हीही उदाहरणांतून आपल्याला मिळतो. उत्तमोत्तम ग्रंथाची निपज ही डॉ. ए. पी. जे. कलाम यांनी आम्हाला दिलेली फार मोठी देणगी आहे. एकेक ग्रंथ हा त्यांच्या देश उभारणी विषयक विचारांचा मला मोठा खाव आहे. हेच खाव आज आमचे दीपस्तंभ बनले आहेत.

गरीबी माणसांसाठी केवढे मोठे वरदान असते याचे सुंदर उदाहरण आपण आपल्या राष्ट्रपती बद्दलच देवू शकतो ते म्हणजे – इजिनिअरिंगच्या तिसऱ्या वर्षाला असतांना एका विमानाचे डिजाईन बनविण्याचा प्रकल्प डॉ. ए. पी. जे. कलाम व इतर ४ सहकाऱ्यांनी देण्यात आला. अडचणींमुळे ते काम पुर्णत्वास जात नव्हते. शिक्षकांनी विचारणा केल्यावर विद्यार्थ्यांनी १ महिना वेळ लागेल असे सांगितले पण शिक्षक ऐकेनात. कदाचित ३ दिवसात प्रकल्प पूर्ण झाला नाही तर डॉ. ए. पी. जे. कलाम यांची शिष्यवृत्ती बंद होईल अशी धमकी त्यांना खाव लागली. त्यावटहुकूम डॉ. ए. पी. जे. कलाम यांनी खरच फक्त ३ दिवसात तो प्रकल्प पूर्ण केला आणि तणावाखाली काम केल्याने आत्मविश्वास कसा कायम ठेवावा लागतो, याचा धडाही त्यांना मिळाला.

जीवनात बऱ्याचशा गोष्टी सांगून येत नाहीत. डॉ. ए. पी. जे. कलाम यांनी आपल्या आयुष्यात अशाच प्रसंगाचा सामना केला. म्हणूनच त्यांच आयुष्य हे समस्तांसाठी एक आदर्श बनलं. भारतीय तरुणांपुढची सर्वात मोठी समस्या जर कोणती असेल तर ती स्पष्ट दृष्टीचा अभाव स्पष्ट, स्पष्ट मताचा अभाव. तरुणांना ते सांगतात की, "कुणी कितीही छोटा असेल, गरीब असेल, अभावाच्या परिस्थितीत असेल, तरी त्याने हिंमत हारण्याची गरज नाही. समस्या हो जीवनाचा एक भाग आहे, दुःख हे यशाचे सार आहे. कुणी म्हटलेले आहे...

देवाने वचन दिलेले नाही,
आकाश सदैव निळेचे गहील
आयुष्याच्या पाऊलवाटा
फुलांनी सजलेल्याच राहतील
देवाने वचन दिलेले नाही,

An International Indexed Refereed Peer Reviewed Interdisciplinary Multilingual Multisubject Monthly Research Journal
Vol VI, Issue XI, November 2020
ISSN 2395-759X

पावसाशिवाय सूर्य
दु:खाशिवाय सुख
वेदनेशिवाय शांती

माझे आयुष्य दुसऱ्या कुणासाठी आदर्श आहे, असा माझा दावा नाही पण कुणी गरीब मुलगा, कोपऱ्यातल्या गावी राहत असेल, निराशेच्या, मागासपणाच्या खोटया आभासमय कल्पनांच्या बंधनातून मुक्त व्हायला मदत होईल. आता तशी मुले कुठे आहेत मला ठाऊक नाही; पण देव सदैव त्यांच्या बरोबर आहे आणि देव जेव्हा त्यांच्या सोबत आहे, तेव्हा त्यांच्या विरूद्ध कोण असू शकेल!

पण देवाने वचन दिले आहे
दिवसापुरती शक्ती
श्रमानंतर विश्रांती
पावलापुरता प्रकाश''[५]

चिंतन हे व्यक्तीचा दर्जा ठरवत असते. व्यक्तीचा बौद्धीक दर्जा/क्षमता सिद्ध करत असते. जीवनानुभव आणि चिंतन यांचा अत्यंत जवळचा संबंध आहे. चिंतनामुळे भूतकाळातील यश व अपयश यांकडे डोळसपणे पाहण्याची संधी मिळते. चिंतन करणाऱ्यांसाठी भूतकाळ हा एक अनुभव किंवा बोध असतो आणि भविष्यकाळ हा एक स्वप्न असतो. स्वप्न पूर्ण करण्याचे सामर्थ्य चिंतनातून प्राप्त होत असते. "एकदा एका मोठया कार्यक्रमात कलामांना विचारले गेले की, तुम्ही अनेक क्षेत्रात संशोधन केले आहे, अनेक यंत्रे, शस्त्रे यांची निर्मिती केली आहे. तुमच्या आयुष्यातले सर्वात मौलिक संशोधन कोणते? सर्वांना असे वाटत होते की, ते एखाद्या क्षेपणास्त्राचे नाव घेतील किंवा पोरखण येथे घडवलेल्या अणुस्फोटाचे उदाहरण देतील पण डॉ. ए. पी. जे. कलामांनी उत्तर दिले. आमच्या D.R.D.O मध्ये शोधून काढलेल्या कार्बनफायबरच्या नवीन पदार्थामुळे पोलिओग्रस्त मुलाच्या पायाला बळ देणाऱ्या कॅलिपर्सचे वजन एक दशांशवर आणण्यात यश मिळाले व तो माझ्या संशोधनाचा अत्युच्च मानबिंदू होता''[६]

वेदना येतात त्याच मूळी ऋण ठेवून जाण्यासाठी. वेदना हया मानवीत नाहीत, त्या अहंकारी बनवीत नाहीत. त्या मित्रत्वाला, सख्याला आमंत्रित करत असतात. वेदनेत माणूस माणूसपण जाणून असतो. वेदना हया जीवनाचा शाप नव्हे तर अभिशाप आहेत. अभिशाप संपला की, जीवनाला सुगंध येतो. अनंताचा ध्यास ही वेदनेची मुक्ती आहे.''[७]



An International Indexed Refereed Peer Reviewed Interdisciplinary Multilingual ...
Vol VI, Issue XI, November 2020
ISSN 2395-759X

डॉ. ए. पी. जे. कलाम यांच्या संदर्भात एक उदाहरण देता येईल की, विक्रम साराभाई हयांना डॉ. ए.पी.जे. कलाम आपले गुरूस्थान मानत असत. भारतीय स्पेस रिसर्च सेंटरचा त्यांना ते जनक मानायचे. त्यांच्या आठवणीतच विक्रम साराभाई स्पेस सेंटर (V.S.S.C) त्यांनी स्थापन केलं. पंडीत नेहरू आणि विक्रम साराभाई यांनी देशाचं प्रगत स्वप्न पाहिलं होतं. स्पर्धेत उतरण्यासाठी गरीबी – श्रीमंती कोणी पाहत नाही. तिथे पाहले जातात परिश्रम आणि प्रयत्न. त्रिवेंद्रम येथे डॉ. ए. पी. जे. कलाम यांना भेटण्यासाठी विक्रम साराभाई जाणार होते. त्यांची भेट घेण्यासाठी कलाम स्वत: विमानतळावर आले होते. अचानक बातमी आली की, हृदयविकाराच्या धक्याने साराभाई निधन पावले.

कल्पनाशक्ती, धार्मिकता आणि परमेश्वरावरील श्रद्धा हे डॉ. ए. पी. जे. कलाम यांच्या जीवनातील तीन पायाभूत घटक होत. शेक्सपीअरने, 'जीवन म्हणजे केवळ एक चालणारी सावली आहे' असे म्हटले आहे. कवी गुलजार डॉ. ए. पी. जे. कलाम यांचे गुणवर्णन पुढील शब्दात करतात की, "मै एक गहरा कुआँ हु! ठस जमीन पे बेसुमार लडके लडकीयों के लिए जीवन की प्यास बुझाता रहूँ! उसकी बेपनाह रहमत पर उसी तरह जन्हे जन्हे पर बरसती रहे! जैसे कुआँ सबकी प्यास बुझाता है!''

तात्पर्य, अशाप्रकारे डॉ. ए. पी. जे. कलाम नावाच्या कलाकाराने स्वत:चे प्रगटीकरण आपल्या उर्जेतून केलेले आहे. त्यामुळे त्यांचे संपूर्ण आयुष्य म्हणजे एक सृजनाचा सोहळा होता. त्यामुळे ते इतरांना आनंद देवू शकले आणि तेही अखेरपर्यंत. तोच त्याचा अनंताचा खरा शोध होय, असं मला वाटते.

## संदर्भ सूची

१ कर्मयोगी - डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम, डॉ. कर गरद, स्नेहल प्रकाशन, पुणे (मुखपृष्ठावरील माहिती)
२ टर्निंग पॉईंटस – डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम, (अनुवाद – अजनी नरवणे), मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे (मुखपृष्ठावरील माहिती)
३ प्रज्वलित मन – डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम (अनुवाद – चद्रशेखर मुरगूडकर), विनार पब्लिशर्स ११ ए आनंद गुलदस्त सौमित्र सोसायटी, चव्हाण नगर, धनकवडी, पुणे – ४११०४३ (अर्पणपत्रिका)
४ जीवनमूल्ये भाग २ – प्रा. प्र.ग. सहस्त्रबुद्धे, श्रीभारती प्रकाशन, डॉ. हेडगेवार भवन, महाल, नागपूर ३२ पृ. २२२
५ ज्ञानदीप भाग १ – मराठी पाठयपुस्तक, मंडळ, अमरावती ओरिएंट ब्लॅक स्वान प्रायव्हेट लिमिटेड, पृ. ५५-५६
६ कर्मयोगी – उनि पृ. ९१
७ संवेदना – जयंत गायकवाड, पिंपळापुरे बुक डिस्ट्रीब्युटर्स, महाल, नागपूर, प्रथमावृत्ती – २००४, पृ. ७४